श्री नामदेव दामोदर तांबे, प्राथमिक शिक्षक
पदावरुन तात्पुरत्या दूर केलेले,
पंचायत समिती कर्जत
यांना जि.प.सेवेत पुन:स्थापीत करणे बाबत

अहमदनगर जिल्हा परिषद
शिक्षण विभाग (प्राथमिक)
जावक क्रमांक. कार्या2/खाचौद/ ३६७ /२०२१
अहमदनगर, दिनांक - २७ /०८ /२०२१

संदर्भ -
1) या कार्यालयाकडील पदावरुन तात्पुरत्या रित्या दूर केलेला आदेश क्रमांक क्रमांक कार्या2/खाचौद/३/२०२०, दिनांक ०३/०१/२०२०
2) या कार्यालयाकडील १ ते ४ दोषारोप आदेश क्रमांक कार्या2/खाचौद/97/2020 दिनांक १६/०३/२०२०
3) सहाय्यक आयुक्त, नाशिक विभाग नाशिक यांचेकडील चौकशी अहवाल क्रमांक विशा4/खा.चौ./सी.आर.६३/२०२०, दिनांक ०४/०३/२०२१
४) न्यायालयीन रिट याचिका क्रमांक ४४/२०२० चा अंतिम निकाल दिनांक ०९/०४/२०२१
५) मा.निलंबन आढावा समिती नाशिक यांचेकडील आदेश क्रमांक मशा/पुनस्था-२०२१/प्र.क्र.२११९३/१५२४५-१५, दिनांक ०७/०७/२०२१
६) गट शिक्षणाधिकारी,पं.स.कर्जत यांचेकडील पत्र क्रमांक वशि/आस्था४/१२२/२०२१, दिनांक ०५/०८/२०२१, प्राप्त दिनांक १०/०८/२०२१
7) महाराष्ट्र जिल्हा परिषद जिल्हा सेवा (शिस्त व अपील) नियम १९६४
8) महाराष्ट्र शासन सामान्य प्रशासन विभाग यांचेकडील शासन निर्णय क्रमांक निप्रआ/१११९/प्र.क्र.८६/११अ, दिनांक १४/२०/२०११

श्री नामदेव दामोदर तांबे, प्राथमिक शिक्षक, जिल्हा परिषद प्राथमिक शाळा बरकाडे वस्ती, ता. कर्जत हे शालेय कामकाजाचे कर्तव्य कामी कार्यरत असताना त्यांनी केलेल्या गैरवर्तनामुळे दिनांक 03/01/2020 अन्वये जिल्हा परिषद सेवेतील प्राथमिक शिक्षक या पदावरुन तात्पुरत्या रित्या दूर करणेत आले होते. श्री नामदेव दामोदर तांबे, प्राथमिक शिक्षक, जिल्हा परिषद प्राथमिक शाळा बरकाडे वस्ती, ता. कर्जत यांचे पदावरुन तात्पुरत्या रित्या दूर केलेल्या कालावधीमध्ये मुख्यालय पंचायत समिती संगमनेर येथे ठेवणेत आलेले होते.

श्री नामदेव दामोदर तांबे, प्राथमिक शिक्षक, जिल्हा परिषद प्राथमिक शाळा बरकाडे वस्ती, ता. कर्जत यांनी केलेल्या गैरवर्तनाबाबत त्यांचे विरुध्द इकडील कार्यालयांने दिनांक 16/03/2020 अन्वये दोषारोप बजाविणेत आलेले होते.

त्याप्रमाणे सहाय्यक आयुक्त, नाशिक विभाग नाशिक यांचे चौकशी अहवालावमधील दोषारोपावरील दोषारोप न्याय प्रविष्ठ असलेचा निष्कर्ष दिलेला आहे. तसेच मा.न्यायालय श्रीगोंदा यांनी दिनांक 09/04/2021 चे निकाला अन्वये श्री नामदेव दामोदर तांबे यांना दोषारोपातून निर्दोष मुक्त केलेले आहे.

महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय मुंबई यांचेकडील दिनांक १४/१०/२०११ चे शासन निर्णयानुसार न्यायालयात अभियोग दाखल झालेल्या निलंबित शासकीय कर्मचा-यास न्यायालयाने

दोषमुक्त केले असेल तर निलंबित कर्मचा-यांस पुन:स्थापीत करणेची तरतुद आहे. सबब संदर्भ क्रमाकं ५ अन्वये प्रदान केलेल्या अधिकाराचा वापर करुन. श्री नामदेव दामोदर तांबे, प्राथमिक शिक्षक, जिल्हा परिषद प्राथमिक शाळा बरकाडे वस्ती, ता. कर्जत जिल्हा अहमदनगर यांना दिनांक 03/01/2020 अन्वये पदावरुन तात्पुरत्या रित्या दूर केलेले आदेश रद्द करुन त्यांना जिल्हा परिषद सेवेत सामावुन घेऊन, त्यांना जिल्हा परिषद प्राथमिक शाळा चौभेवाडी ता. जामखेड (शिक्षण विभाग), जिल्हा - अहमदनगर येथे प्राथमिक शिक्षक या पदावर नियमित पदस्थापना देऊन नेमणुक करणेत येत आहे.

सदर आदेशाची सत्वर अंमलबजावणी करण्यांत यावी. श्री नामदेव दामोदर तांबे, प्राथमिक शिक्षक, यांनी दिलेल्या पदस्थापनेच्या ठिकाणी तात्काळ हजर व्हावे. तसेच सदर आदेशाची नोंद संबंधिताच्या मुळ सेवा पुस्तकांत घेणेत यावी.

सदर आदेश अहमदनगर जिल्हा परिषदेच्या www.nagarzp.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध करण्यांत आला असून त्याचा संकेतांक २०२१०८२८१६००८७ असा आहे.

(राजेंद्र क्षीरसागर)
जिल्हा परिषद अहमदनगर
मुख्य कार्यकारी अधिकारी

प्रती,

श्री.नामदेव दामोदर तांबे प्राथमिक शिक्षक

द्वारा व प्रत - गट शिक्षणाधिकारी पंचायत समिती कर्जत

2/- सदर आदेश श्री.नामदेव दामोदर तांबे यांना बजाविणेत येऊन त्यांची दिनांकीत स्वाक्षरी घेऊन दुय्यम प्रत या कार्यालयांस सादर करावी.

प्रत - गट शिक्षणाधिकारी, पंचायत समिती संगमनेर

प्रत - मुख्य लेखा व वित्त अधिकारी, जिल्हा परिषद अहमदनगर

(राजेंद्र क्षीरसागर)
जिल्हा परिषद अहमदनगर
मुख्य कार्यकारी अधिकारी